मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दि. 30 सप्टेंबर 2024 | पान- 1

# जेष्ठ नेते भाऊसाहेब भोईर निवडणूकीच्या रिंगणात उतरणार

## भाऊसाहेब भोईर यांचा लढण्याचा निर्धार : पत्रकार परिषदेतून केली भूमिका जाहीर

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभेतून जेष्ठ नेते भाऊसाहेब भोईर हे देखील म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. आज झालेल्या पत्रकार परिषदेत भाऊसाहेब भोईर यांनी आपली राजकीय भूमिका स्पष्ट केली. याच बरोबर येत्या २ ऑक्टोबरला मतदारसंघात कार्यकर्ता निर्धार मेळाव्याचे आयोजन करत आपली राजकीय भूमिका स्पष्ट करणार आहेत.

बुधवारी २ ऑक्टोबरला सायंकाळी ५ वाजता रहाटणी येथील थोपटे लॉन्स मध्ये याठिकाणी हा निर्धार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.




भाऊसाहेब भोईर म्हणाले की, गेली अनेक वर्षे मी नगरसेवक म्हणून या शहराचे प्रतिनिधित्व करत आलेलो आहे. उद्योगनगरी म्हणून ओळख असलेल्या या शहराला सांस्कृतिक नगरी ही ओळख निर्माण करुन देण्यासाठी मी सतत प्रयत्नशील आहे.

चिंचवड विधानसभेमध्ये असलेल्या घराणेशाही आणि दडपशाहीमुळे या मतदार संघात विकासाचे केंद्रीकरण होऊ शकले नाही. केवळ स्वतःच्या राजकीय आणि आर्थिक फायद्यासाठी इथल्या लोकप्रतिनिधींनी आपल्या सत्तेचा वापर केलाय. मला वैयक्तिक कोणावरही टीका करायची नसली तरी जनतेला सर्व वस्तुस्थिती माहिती आहे. आणि त्यामुळेच या मतदारसंघातील जनतेला आता बदल हवा आहे.

या सर्व परिस्थितीचा विचार करुन माझ्या कार्यकर्त्यांशी चर्चा केल्यावर आपण निवडणुकीच्या रिंगणात उतरायचे निश्चित केल्याचे भोईर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. मतदार संघात मतदारांची संख्या वाढली. मात्र, समस्या जैसे थे च आहेत. त्यामध्ये २४ तास पाणी पुरवठ्याचा प्रश्न असू द्या, वाढती वाहतूक कोंडीची समस्या असो की घन कचरा व्यवस्थापन, याकडे आत्तापर्यंत इथल्या सत्ताधाऱ्यांनी सोयीस्कर दुर्लक्ष केलं आहे.

हेच प्रश्न घेऊन मी मतदारांच्या पाठींब्यावर या निवडणुकीच्या रिंगणात उतरतोय. मोरया गोसावींची भक्ती हाच माझा पक्ष आणि चाफेकरांची क्रांती हे माझं ध्येय असल्याचे भोईर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

---

# 'चिंचवड विधानसभेत प्रकाश कुणाचा? फक्त मशालीचा'..

## आक्रमक शिवसैनिकांची उद्धव साहेबांना साद.. : चिंचवड मतदारसंघ ठाकरे गटाकडेच रहावा; बैठकीत एकमत...




**पिंपरी | प्रतिनिधी**

कुठल्याही परिस्थितीत चिंचवड विधानसभा मतदारसंघ शिवसेनेच्या ठाकरे गटाकडेच रहावा, यासाठी शिवसैनिकांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. त्यासाठी आज रविवारी (दि.२९) रोजी) शिवसेनेच्या (उद्धव ठाकरे गट) पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांची वाल्हेकर वाडी येथे बैठक झाली. चिंचवड विधानसभा मतदारसंघ फक्त मशाल चिन्हावरच लढविण्याचा निर्धार यावेळी शिवसैनिकांनी बैठकीत केला आहे. लवकरच पक्षाचं एक शिष्टमंडळ उद्धव साहेबांची भेट घेऊन त्यांच्याकडे आग्रही मागणी करणार असल्याची माहिती चिंचवड विधानसभेचे शहर संघटक संतोष सौंदणकर यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

बैठकीला पिंपरी चिंचवड शहर संघटिका अनिता तुतारे, चिंचवड विधानसभा प्रमुख अनंत कोऱ्हाळे, शहर संघटक संतोष सौंदणकर, उपशहरप्रमुख संतोष पवार, नवनाथ तरस, हरेश नखाते, उपशहर संघटीका ज्योती भालके, योगिनी मोहन, विभाग प्रमुख संदीप भालके, गोरख पाटील, शिवाजी पाटील, मच्छिंद्र देशमुख, किरण दळवी, कुदरत खान, सचिन चिंचवडे, नितीन दर्शिले, विभाग संघटिका सुजाता नखाते, वैशाली काटकर, उपविभाग प्रमुख कलावंती नाटेकर, विभाग संघटक अमित दर्शले, युवासेना उपशहर प्रमुख भाऊसाहेब जाधव, युवासेना विभाग प्रमुख विनायक दळवी, शाखाप्रमुख मस्जिद शेख, युवराज अहिरे, जगदीश काटे आदी उपस्थित होते

बैठकीत विधानसभा प्रमुख अनंत कोऱ्हाळे यांनी मुद्दा उपस्थित केला. शहर संघटिका अनिता तुतारे यांनी अनुमोदन दिले. चिंचवड मतदारसंघात 'फक्त मशालीचाच प्रकाश पडण्यास सज्ज आहात का?' असे त्यांनी आवाहन करताच शिवसैनिकांनी घोषणा देत समर्थन दिले. चिंचवड विधानसभा मतदारसंघ हा शिवसेनेचा बालेकिल्ला समजला जातो. भाजप-शिवसेना एकत्र असतानासुध्दा शिवसेनेनेच या मतदारसंघातून अधिकृत उमेदवार देत निवडणूक लढवलेली आहे. त्यामुळे आमचा या मतदारसंघावर प्रथम हक्क आहे. हे महाविकास आघाडीच्या घटक पक्षांनी विसरू नये. एकसंघ असलेल्या शिवसेनेचे पिंपरी चिंचवड महापालिकेत ९ नगरसेवक होते. त्यातील बहुतांशी नगरसेवक हे शिवसेना उद्धव साहेबांच्या पक्षासोबत कायम आहेत. शहरातील बहुतांश माजी नगरसेवक पक्षाशी एकनिष्ठ आहेत. त्यांनी तसेच, शाखाप्रमुख आणि पदाधिकाऱ्यांनी जीवाचे रान करीत लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात आघाडी घेतली होती. मतदार संघातून पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना असलेली सहानुभूतीची लाट नक्कीच विजयश्री खेचून आणेल, अशी आम्हाला खात्री आहे. त्यामुळे उद्धव साहेबांची भेट घेऊन आमची खदखद त्यांच्या कानावर लवकरच घालणार असल्याचा संकल्प यावेळी शिवसैनिकांनी सोडला आहे, अशी माहिती संतोष सौंदणकर यांनी दिली आहे.

---

# नळ कनेक्शन तोडणीबाबतचा 'एसएमएस' फसवणूकीचा..!

## फ्रॉड 'एसएमएस'ला बळी पडू नये; महापालिकेचे नागरिकांना आवाहन



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरामध्ये सध्या ज्या नागरिकांची पाणीपट्टी थकीत आहे अशा मालमत्तेचे नळकनेक्शन तोडण्याची कारवाई सुरू आहे. महापालिकेच्या माध्यमातून याबाबत नागरिकांना थकीत पाणीपट्टी भरण्याचे वेळोवेळी 'एसएमएस' द्वारे व इतर माध्यमातून आवाहन करण्यात येत आहे.

परंतु, शहरात नागरिकांचे आज रात्री ९ वाजता नळकनेक्शन तोडण्यात येईल, अशा आशयाचे एसएमएस राकेश मिश्रा, महापालिका अधिकारी या नावाने व 8009015135 या मोबाईल क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन करणारा फसवणूकीचा 'एसएमएस' पाठविण्यात येत आहे. असे 'एसएमएस' हे नागरिकांची फसवणूक करणारे असून याकडे नागरिकांनी दुर्लक्ष करावे. असे महापालिकेकडून आवाहन करसंकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांनी केले आहे.

# मेट्रोच्या उदघाटन सोहळ्याचा खर्च मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या मानधनामधून घेतला पाहिजे

## अशी मागणी करीत आजच्या कार्यक्रमात उपस्थित राहणार नसल्याची भूमिका यावेळी आमदार रविंद्र धंगेकर यांनी मांडली.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरातील मेट्रोचा महत्त्वाचा टप्पा असलेल्या शिवाजीनगर जिल्हा सत्र न्यायालय ते स्वारगेट भुयारी मार्गाचे लोकार्पण,तर स्वारगेट ते कात्रज या विस्तारित भुयारी मार्गाचे भूमिपूजन कार्यक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गुरुवारी एस. पी. कॉलेजच्या मैदानावर होणार होते. मात्र पुणे शहरातील मुसळधार पाऊस झाल्याने, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुणे दौरा रद्द करावा लागला होता. त्यानंतर मेट्रोचं काम पूर्ण झालं असेल तर उद्घाटनाची वाट न पाहता, मेट्रो सुरू करण्यात यावी. या मागणीसाठी दोन दिवसपूर्वी पुणे मेट्रो कार्यालय बाहेर महाविकास आघाडी नेत्यांकडून आंदोलन करण्यात आले होते.

मात्र त्यापूर्वीच काँग्रेस पक्षाचे आमदार रविंद्र धंगेकर यांनी उद्घाटन सोहळ्यावरून सत्ताधारी पक्षावर टीका केल्याचे पाहण्यास मिळाले असून ते म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी पुण्यातील मेट्रो प्रकल्पाच्या उद्घाटन आणि भूमिपूजन सोहळ्यास आजवर ६ वेळा आले आहे. त्यामुळे यापुढील काळात एकाच प्रकल्पाचे किती वेळा उद्घाटन करायचे, याबाबत सर्व पक्षांनी मिळून आचारसंहिता तयार करण्याची वेळ आली आहे. तसेच दोन दिवसापूर्वी एस. पी कॉलेजच्या मैदानावर उदघाटन सोहळा आयोजित करण्यात आला होता. मात्र मुसळधार पावसामुळे तो कार्यक्रम होऊ शकला नाही. त्या कार्यक्रमासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करण्यात आला होता. त्यानंतर आज गणेश कला क्रीडा रंगमंच येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन उद्घाटन सोहोळा पार पडणार आहे. या कार्यक्रमाला देखील लाखों रुपयांच्या जाहिराती आणि इतर खर्च हा कोट्यावधी रुपयांमध्ये जाणार आहे. या दोन्ही कार्यक्रमास सर्व सामान्य नागरिकांच्या करातील पैशांची उधळपट्टी करण्यात आली आहे. यामुळे सत्ताधारी पक्षाचा निषेध व्यक्त करत असल्याचे त्यांनी सांगितले. आजच्या कार्यक्रमाचा खर्च सर्व सामान्य नागरिकांच्या करामधून न करता, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या मानधनामधून घेतला पाहिजे अशी मागणी करीत आजच्या कार्यक्रमात उपस्थित राहणार नसल्याची भूमिका यावेळी त्यांनी मांडली.



### खर्च टाळायला हवा होता

» धंगेकर यांनी मेट्रोच्या उद्घाटनाभोवती असलेल्या राजकीय वातावरणावरही टीका केली आणि ते "दुर्दैवी" असल्याचे म्हटले आणि सरकारने सार्वजनिक निधीला प्राधान्य देण्याचे आवाहन केले. "हे टप्प्याटप्प्याने होणारे उद्घाटन अनावश्यक आहेत. जाहिराती आणि कार्यक्रमांवर जास्त खर्च न करता राज्याचे नेते किंवा पालकमंत्री सहजपणे कर्तव्य पार पाडू शकले असते. पुण्याचा नागरिक म्हणून हा खर्च टाळायला हवा होता, असे मला वाटते," असे धंगेकर यांनी शेवटी सांगितले.

### निवडणुका डोळ्यासमोर ठेवून उद्घाटन योजना

» "शहरातील मेट्रोच्या टप्प्याटप्प्याने उद्घाटनासाठी पंतप्रधान मोदी पुण्याला येणार होते, परंतु यामुळे राज्य आणि राष्ट्रीय तिजोरीवर मोठा आर्थिक बोजा पडणार होता. मोदींना या परिणामाची माहिती नाही," अशी टिप्पणी धंगेकर यांनी केली. "तर संबंधित खर्च हा कोट्यवधी रुपयांपर्यंत चालतो व तो टाळता आला असता. मोदींनी यापूर्वी त्यांच्या कार्यालयातून उद्घाटने केली आहेत.यावेळीही त्यांनी तसे केले असते तर लाखो रुपयांची बचत होऊ शकली असती. त्याऐवजी, आगामी महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून ही उद्घाटन योजना आखण्यात आली आहे, ज्यातून असं भासतं की पुण्यासाठी काहीतरी मोठं केले जात आहे ", असे धंगेकर म्हणाले.

# राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रता प्रकरणाचा निकाल जाहीर

## आमदार अपात्रता प्रकरणात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर निकाल जाहीर केला.

**पुणे | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रता प्रकरणात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आज निकाल जाहीर केला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचा आहे असा निकाल राहुल नार्वेकर यांनी दिला. विधिमंडळ गटात अजित पवार यांचं पाठबळ जास्त असल्यामुळे असा निकाल दिल्याचं विधानसभा अध्यक्षांनी स्पष्ट केलं. तसेच अजित पवार गटाचे आमदार पात्र ठरल्याचंही त्यांनी जाहीर केलं.

अजित पवार केवळ सरकारमधून, पक्षातून बाहेर पडले आणि त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावरच दावा केला. पक्षात शरद पवारांचा गट आणि अजित पवारांचा गट अशी फूट पडली. त्यानंतर हा वाद निवडणूक आयोग आणि विधानसभा अध्यक्षांसमोर गेला. निवडणूक आयोगाने नुकताच निकाल देऊन अजित पवार यांना पक्षाचे अध्यक्ष असल्याचं जाहीर केलं. त्यानंतर आज विधानसभा अध्यक्षांनी निकाल दिला.

पक्ष कार्यकारिणीतील बहुतेक सदस्य जरी शरद पवार यांना पाठिंबा देत असले तरी त्यांची नेमणूक पक्षाच्या घटनेला धरुन झालेली नाही. त्यामुळे तिचा विचार करता येत नाही. पक्षाची रचना आणि कार्यकारिणी यावरुन निर्णय घेता येत नसल्यामुळे विधिमंडळ पक्षाचा पाठिंबा कोणाला आहे याचा विचार करावा लागेल.

विधानसभेत 53 पैकी 42 सदस्यांचा अजित पवार यांना पाठिंबा आहे. यासंदर्भात अजित पवार गटाने सादर केलेल्या दस्तावेजाला शरद पवार गटाने आव्हान दिलेले नाही. त्यामुळे बहुतांश सदस्यांचा अजित पवारांना पाठिंबा असल्याचं सिद्ध होतं. त्यामुळेच पक्षाचे तेच नेते आहेत असा निष्कर्ष निघतो, असे राहुल नार्वेकर यांनी सांगितले.



# पुणे शहरातील कारखान्यात मोठा अपघात, चार कामगारांचा मृत्यू

## येवलेवाडी येथे काचेच्या कारखान्यात अपघात झाल्याची घटना घडली.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरातील येवलेवाडी येथील कारखान्यात मोठा अपघात झाला. काचेच्या कारखान्यात हा अपघात झाला. गाडीतून काचा उतरवताना काचेच्या पेटीखाली काही कामगार दाबले गेले. या अपघातात चौघांचा मृत्यू झाला आहे. एकावर रुग्णालयात उपचार सुरु आहे. येवलेवाडीतील इंडिया ग्लास या काचेच्या कंपनीत ही दुर्घटना घडली आहे. मृत्यू झालेले चौघे कामगार उत्तर प्रदेशातील रहिवाशी आहेत.

येवलेवाडी येथे दुपारी एक ते दीडच्या दरम्यान ही घटना घडली. या ठिकाणी असलेल्या एका काचेच्या कारखान्यात माल उतरताना काचा फुटल्या. त्यात काचेच्या पेटीखाली काही कामगार अडकल्याची माहिती कोंढवा भागातील अग्निशामक दलाला मिळाली होती. त्यानंतर तातडीने अग्निशामक दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी काचेच्या पेटीखाली दाबले गेलेल्या सर्व कामगारांना बाहेर काढले. त्यातील चार जण अस्वस्थ होते. त्यांना ससून रुग्णालयात दाखल केले होते. परंतु दाबले गेलेल्या सहा कामगारांपैकी चार जणांचा दुर्दैवी मृत्यू आहे. एका कामगाराची प्रकृती गंभीर आहे.

पुणे अग्निशमन विभागातील कोंढवा स्टेशन अधिकारी समीर शेख यांनी घटनेची माहिती देताना सांगितले की, रविवारी दुपारी येवलेवाडी भागातील कारखान्यात अपघात झाल्याची माहिती आम्हाला मिळाली. त्यावेळी काही लोक काचेच्या पेटीखाली दबले होते. त्या पेट्यांचे वजन खूप होते. एका पेटीचे वजन दोन ते अडीच टन होते. त्यातील चार जण पेटीखाली दाबले गेले होते.

येवलेवाडी कारखान्यात काम करणारे पवन रामचंद्र कुमार (वय ४०), धर्मेंद्र सत्यपाल कुमार (वय ४०), विकास प्रसाद गौतम (वय २३), अमित शिवशंकर कुमार (वय २७ ) या चौघांचा मृत्यू झाला आहे. हे सर्व कामगार उत्तर प्रदेशातील रहिवाशी आहे. तसेच या अपघातात मोनेसर कोळी (वय ३१) आणि जगतपाल संतराम कुमार (वय ४१) हे गंभीररित्या जखमी झाले आहेत.



# महापालिकेच्या नवीन इमारतीचे काम प्रगतीपथावर

## महापालिकेच्या नवीन इमारतीमुळे सर्व महापालिका कार्यालयांना एकाच छताखाली केंद्रित करणे हा उद्देश साध्य होणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. महापालिकेच्या नवीन इमारतीमुळे सर्व महापालिका कार्यालयांना एकाच छताखाली केंद्रित करणे, नागरिकांना अधिकाधिक सेवा सुलभ पद्धतीने पुरविणे आणि एकूण कार्यक्षमतेत सुधारणा करणे हा उद्देश साध्य होणार असल्याचा दावा महापालिकेच्या अधिका-यांनी केला आहे.

जानेवारी २०२३ मध्ये इमारतीच्या कामाला सुरुवात केली होती. पाया आणि तळघराच्या पातळीचे काम पूर्ण झाले आहे.सध्या तळमजला बांधण्याचे काम सुरू आहे. इमारतीचे काम पूर्ण झाल्यावर नवीन सुविधांमध्ये नागरिक सेवा केंद्र, बहुउद्देशीय हॉल आणि ई-गव्हर्नन्स केंद्र यांसारख्या सार्वजनिक सुविधांचा समावेश असणार आहे.

त्यामुळे नागरिकांना महापालिकेच्या सेवा एकाच छताखाली उपलब्ध होणार आहेत. यामध्ये मेळावे, प्रदर्शने आणि सार्वजनिक कार्यक्रम घेण्याची सोय होणार आहे.तब्बल ८.६५ एकर भूखंडावर महापालिकेची नवीन इमारत बांधण्यात येत आहे. ग्रीन बिल्डींगनुसार इमारतीचे बांधकाम करण्यात येणार असून इमारतीस गृह (ग्रीन रेटिंग फॉर इंटग्रेटेड हॅबिटेट असेसमेंट) परिषदेचे ५ स्टार मानांकन आणि इंडियन ग्रीन बिल्डींग काऊंसिलचे (आयजीबीसी) प्लॅटिनम मानांकन मिळविण्याचे महापालिकेचे उद्दिष्ट आहे.

यासोबतच सोलर पॅनेल, पाण्याचा पुनर्वापर करणारी यंत्रणा आणि ग्रीन स्पेसेस यांसारख्या वैशिष्ट्यांसह परिपुर्ण असलेल्या या इमारतीची संरचना नागरिक तसेच कर्मचाऱ्यांसाठी पर्यावरणपूरक आणि प्रसन्न वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने तयार करण्यात येणार आहे.

के. एम. व्ही. प्रोजेक्ट्स लि. हैदराबाद हे प्रकल्पाचे ठेकेदा र असून सुनिल पाटील असोसिएट्स प्रा. लिं हे वास्तुविशारद व प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार आहेत, अशी माहिती महापालिका अधिका-यांनी दिली.



### तळमजल्यावर आहेत या सुविधा

- वाचनालय – १२५ चौ.मी.
- प्रदर्शन हॉल-संग्रहालय – ३८० चौ.मी.
- बहुउद्देशीय हॉल – ५७० चौ.मी.
- महापालिका सभागृह – १८६५ चौ.मी (आसन क्षमता ४६२)

### प्रमुख वैशिष्ट्ये

- प्रकल्प खर्च – ३१२ कोटी ( निविदा रक्कम – २८६ कोटी)
- ग्रीन बिल्डींग सर्टिफिकेट – गृह (ग्रीन रेटिंग फॉर इंटग्रेटेड हॅबिटेट असेसमेंट) परिषदेचे ५ स्टार मानांकन आणि इंडियन ग्रीन बिल्डींग काऊंसिलचे (आयजीबीसी) प्लॅटिनम मानांकन मिळविण्यावर भर
- प्रकल्प क्षेत्र – ९१ हजार ४५९ चौरस मीटर बांधकाम क्षेत्रासह ८.६५ एकर भूखंड
- पर्यावरणपूरक सुविधा – सौर ऊर्जेचा वापर, पाण्याचा पुनर्वापर आणि ग्रीन स्पेसेस
- इमारतीची रचना – प्रत्येकी ३ तळघरांसह ६ ते १८ मजल्यापर्यंतचे ३ विभाग
- आधुनिक सुविधा – नागरिक सेवा केंद्र, बहुउद्देशीय सभागृह, ई-गव्हर्नन्स केंद्र, ग्रंथालय, दवाखाना आणि बरेच काही
- प्रकल्पाची मुदत – जानेवारी २०२३ पासून ३६ महिने (खोदकाम आणि तळघराचे काम पुर्ण झाले आहे)

> याद्वारे नागरिकांसाठी सर्वसमावेशक वातावरण तयार करण्यासाठी महापालिका कटिबद्ध असून एकाच छताखाली उपलब्ध असलेल्या विविध सेवांच्या विस्तृत सोयीसह जनतेसाठी अखंड सेवा प्रदान करणे हे यामागचे उद्दिष्ट आहे.
> - शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

# मावळात एक लाख 'लाडक्या बहिणी'

## मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण योजनेचा जास्तीत जास्त महिलांना लाभ मिळावा यासाठी जनजागृती करण्यात आली

**पिंपरी | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण योजनेचा जास्तीत जास्त महिलांना लाभ मिळावा यासाठी मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात आली. विविध ठिकाणी नोंदणी केंद्रे उभारुन योजना प्रभावीपणे मावळ विधानसभेत राबविण्यात आली.

त्यामुळेच तालुक्यात आतापर्यंत एक लाख तीन हजार १७८ भगिनी या योजनेसाठी पात्र ठरल्या आहेत, अशी माहिती मावळचे आमदार तथा मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना समितीचे अध्यक्ष सुनिल शेळके यांनी दिली.

मावळ विधानसभा मतदारसंघातील मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची सद्यस्थिती व आढावा घेण्यासाठी मावळ तहसील कार्यालयात बैठक संपन्न झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी आमदार सुनिल शेळके होते. त्यावेळी त्यांनी ही माहिती दिली. बैठकीला तहसीलदार विक्रम देशमुख, हवेलीचे तहसीलदार जयराज देशमुख, गटविकास अधिकारी सुधीर भागवत, एकात्मिक बाल विकास अधिकारी विशाल कोतागडे,



वडगाव नगरपंचायत मुख्याधिकारी प्रवीण निकम, देहू नगरपंचायत मुख्याधिकारी निवेदिता घाडगे, तळेगाव दाभाडे नगरपरिषदेच्या उप मुख्याधिकारी ममता राठोड, तसेच मावळ विधानसभेतील इतर अधिकारी उपस्थित होते.

यावेळी आमदारांनी बैठकीत पडताळणी केलेले अर्ज, मंजूर झालेले अर्ज याची सविस्तर माहिती घेतली. अंगणवाडी सेविका व प्रशासन स्तरावरील कर्मचाऱ्यांशी संवाद साधून त्यांना येणाऱ्या अडचणी व समस्या जाणून घेतल्या.

महायुती सरकारच्या माध्यमातून महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी ही योजना आहे. या योजनेच्या लाभापासून आपल्या तालुक्यातील कुठलीही पात्र महिला-भगिनी वंचित राहू नये, यासाठी प्रशासनाने सर्वतोपरी काळजी घेतली आहे.

काही भगिनींचे अर्ज अपूर्ण माहिती, अर्धवट कागदपत्रांची पूर्तता तसेच इतर योजनांचा लाभ मिळत असल्यामुळे पात्र ठरल्या नसतील. तसेच ज्या महिलांची सर्व कागदपत्रे असुनही अर्ज योग्य ठिकाणी भरले नसल्यामुळेच लाभ मिळाला नसेल.

त्यांनी अंगणवाडी सेविका यांच्याकडे किंवा अधिकृत केंद्रांवरच अर्ज भरणे आवश्यक होते. मावळातून जास्तीत जास्त महिलांना या योजनेचा लाभ मिळाला याबद्दल समाधानी आहे. असे आमदार सुनिल शेळके म्हणाले.

# पिंपरीतील लोक अदालतीमध्ये 3013 खटले निकाली...

## महानगरपालिका न्यायालय, जिल्हा विधी प्रधिकरण, ॲडव्होकेटस् बार असोशिएशन यांच्या संयुक्त विद्यमानाने अदालतीचे आयोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड न्यायालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका न्यायालय आणि पुणे जिल्हा विधी प्रधिकरण तसेच पिंपरी – चिंचवड ॲडव्होकेटस् बार असोशिएशन यांच्या संयुक्त विद्यमानाने राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोक अदालतीमध्ये दोन्ही न्यायालयात एकूण ३०१३ खटले निकाली निघाले; आणि एकूण रक्कम रुपये ४,४२,३२,७४८ वसुली करण्यात आली.

पिंपरी, नेहरूनगर न्यायालयाचे न्यायाधीश एन. आर. गजभिये, अल अमुदी, व्ही. एन. गायकवाड आणि व आकुर्डी न्यायालयात व्ही. एस. डामरे यांनी आणि त्यांच्या समवेत पॅनल जज्ज म्हणून ॲड. मोनिका गाढवे, ॲड. वैभव कल्याणकर, ॲड. तमन्ना रोहरा, ॲड. दिव्या संहिता यांनी कामकाज पाहिले.



न्यायालयाचे न्यायाधीश एन. आर. गजभिये यांनी लोक अदालतबाबत मार्गदर्शन केले. लोकन्यायालयाचे महत्त्व, त्याची स्थापना आणि भविष्यातील त्याचे महत्त्व पटवून सांगितले. उपस्थितांना लोकन्यायालयाची संकल्पना पटवून देऊन सामंजस्याने कसे वाद मिटविता येतील याचे मार्गदर्शन त्यांनी केले. यावेळी एस. एन. बी. पी कॉलेजचे विद्यार्थी, नागरिक आणि वकील बांधव – भगिनी यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे नियोजन पिंपरी – चिंचवड ॲडव्होकेटस् बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. रामराजे भोसले पाटील आणि सचिव ॲड. धनंजय कोकणे, महिला सचिव ॲड. मोनिका सचवाणी, ऑडिटर ॲड. संदीप तापकीर, सदस्य ॲड. फारूख शेख, ॲड. दशरथ बावकर, ॲड. अस्मिता पिंगळे, ॲड. अयाज शेख यांनी केले. ॲड. मोनिका गाढवे यांनी सूत्रसंचालन केले. ॲड.फारूख शेख यांनी आभार मानले.

# देवेंद्र फडणवीस यांनी सांगितला पुणे मेट्रोचा विस्ताराचा प्लॅन

## पुण्यातील विस्तारीत मेट्रो वाघोली, चांदणी चौक आणि इतर भागांत होत आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरातील बहुप्रतिक्षेतील शिवाजीनगर ते स्वारगेट मेट्रो प्रकल्पाचे उद्धघाटन रविवारी झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने या प्रकल्पाचे उद्‌घघाटन झाले. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार हे प्रत्यक्षात पुण्यात उपस्थित होते. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी पुणे मेट्रोचे वेगळेपण सांगितले. पुणे मेट्रोने देशातील सर्वात वेगाने पूर्ण झालेला प्रकल्प असल्याचा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला.

“क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांनी जो आपल्याला वारसा दिला, तो पुढे नेणारा आजचा कार्यक्रम आहे. भिडे वाड्यात मुलीची पहिली शाळा सुरु झाली. अनेक लोक त्या काळात दुस्वास करायचे. विरोध करत होते. शेणाचे गोळे, दगड धोंडे फेकायचे. पण सावित्रीबाई फुले मागे हटल्या नाहीत. क्रांती सूर्य महात्मा ज्योतिबा फुले त्यांच्यामागे उभे होते. शाळा सुरु झाली. त्या एका शाळेने मुलींसाठी शिक्षणाचे दरवाजे उघडले. हा शिक्षणाचा, समाज सुधारणेचा वारसा आपल्याला मिळाला आहे. त्या वारशाची आठवण करुन देणारं स्मारक भिडे वाड्यात करण्यासाठी कार्यक्रम आयोजित केला” असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

“भुजबळ साहेबांनी इतिहास सांगितला. कशाप्रकारे वर्षानुवर्ष भिडे वाडा मिळाला पाहिजे म्हणून लढाई सुरु होती. अतिशय कमी कालावधीत सुंदर प्रकारच स्मारक पुढची 100, 200, 500 वर्ष प्रेरणा देत राहिल ते सुरु होतय. म्हणून मनापासून अभिनंदन” असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. “पुणे समाजसुधारकांची भूमी आहे. आज वारशाचा जसा कार्यक्रम आहे, तसा विकासाचा सुद्धा आहे” असं फडणवीस म्हणाले.

पुणे मेट्रो प्रकल्पाची माहिती देताना देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना टोला लगावला. “पुणे मेट्रोच उद्‌घाटन पुढे गेलं, म्हणून काही लोक छाती बडवत होते. ज्यांनी कधी एक पिलर उभारला नाही, ते छाती बडवण्यात पुढे होते. काहीतरी करुन दाखवा, मग छात्या बडवा” अशी टीका त्यांनी विरोधकांवर केली. “2014 साली युती सरकार आल्यानंतर पुणे मेट्रोल गती मिळाली. पुणे मेट्रोची काम वेगात पूर्ण झाली. पुणे मेट्रोचा पहिला टप्पा हा देशात वेगाने पूर्ण होणारा पहिला टप्पा आहे” असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.



### स्वारगेट स्टेशन पाहण्यासाठी येणार

» स्वारगेट स्टेशन अर्धवट झाल्याचा आरोप होत आहे. त्यावर देवेंद्र फडणवीस यांनी खुलासा केला. ते म्हणाले, स्वारगेट स्टेशन हे मल्टीमॉडल स्टेशन आहे. या ठिकाणी सर्व प्रकारची वाहतूक एकत्र येणार आहे. देशात हे पहिले असे मल्टीमॉडेल स्टेशन असणार आहे. यामुळे लोक मेट्रोने प्रवास करण्यासाठी नाही तर हे स्टेशन पाहण्यासाठी येतील, असा आराखडा या मेट्रो प्रकल्पाचा केला आहे. पुण्यातील विस्तारीत मेट्रो वाघोली, चांदणी चौक आणि इतर भागांत होत आहे. यामुळे भविष्यात पुण्यातील कोणत्याही टोकापासून कोणत्याही टोकापर्यंत मेट्रोने प्रवास करता येईल. पुणे शहर मेट्रोने इन्ट्रीग्रेट होणार आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

### काय म्हणाले देवेंद्र फडणवीस

» भाजप नेते देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पुणे मेट्रोचे काम २०१४ साली सुरु झाले. आपले सरकार आल्यावर या कामास गती मिळाली. पुणे मेट्रोसाठी कंपनी स्थापन केली गेली. अत्यंत वेगाने कामे सुरु करण्यात आली. देशातील सर्वात वेगाने काम पूर्ण होण्याचा मान पुणे मेट्रोच्या पहिला टप्पाला मिळाला. मेट्रो शिवाजीनगर ते हिंजवडी मेट्रो ही देशातील पहिली टीटीपी मोडची मेट्रो आहे. सर्वच पद्धतीने विचार करुन पुण्यातील वाहतूक मॅनेज करण्याचे काम या ठिकाणी झाले आहे.

### अजित पवार यांनी विरोधकांना घेरले

» पुणे मेट्रोवरुन आंदोलन करणाऱ्या विरोधकांना अजित पवार यांनी घेरले. ते म्हणाले, 26 तारखेला हा कार्यक्रम होणार होता. मात्र पाऊस झाला आणि पुणेकराना त्रास होऊ नये, म्हणून कार्यक्रम रद्द करण्यात आला. विरोधकांना काही कामे राहिली नाहीत, त्यामुळे ते काही बोलत सुटले आहेत. पुण्यातील ही मेट्रो अंडरग्राउंड व्हावी, असे अनिल शिरोळे यांना वाटत होते. मात्र खर्च जास्त होत होता. परंतु सार्वजनिक वाहतूक व्यवस्था जोपर्यंत होत नाही तोपर्यंत वाहतूक कोंडीचा प्रश्न मिटणार नाही, हे लक्षात घेऊन आणि पुढील 50 वर्षांचा विकास लक्षात घेऊन हा प्रकल्प उभा राहिला आहे.

# माझी वसुंधरा अभियान स्पर्धेत मंचर नगरपंचायत द्वितीय

## दोन कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर,मुख्याधिकारी गोविंद जाधव यांची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

माझी वसुंधरा अभियान 4.0 या पुरस्काराची घोषणा महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने शुक्रवार, दि.२७ रोजी केली. आंबेगाव तालुक्यातील मंचर नगरपंचायतीने माझी वसुंधरा अभियान 4.0 मध्ये भाग घेतला होता. यात पंधरा ते वीस हजार लोकसंख्या गटासाठी माझी वसुंधरा अभियान 4.0 मध्ये राज्यात द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार व त्यासाठी दोन कोटी रुपये बक्षीस जाहीर झाले आहे, अशी माहिती मंचर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी गोविंद जाधव यांनी शनिवार, दि.२८ रोजी दिली.

मागील वर्षी ९४ व्या क्रमांकावर असलेल्या मंचर नगरपंचायतीने यावर्षी थेट द्वितीय क्रमांकावर मजल मारली म्हणून “उंच उडी ” या घटकाअंतर्गत विशेष पारितोषिक म्हणून एक कोटी रुपये आणि आता जाहीर झालेला द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार व त्यासाठी दोन कोटी रुपये, असे एकूण तीन कोटी रुपयांची रक्कम नगरपंचायतीला मिळणार आहे. या अभियानामध्ये महाराष्ट्र राज्यातील ४१४ नागरी स्थानिक संस्था, २२ हजार २१८ ग्रामपंचायती अशा एकून २२ हजार ६३२ स्थानिक संस्थानी भाग घेतला होता.

भूमी, वायू, जल, अग्नी आणि आकाश या पंचमहाभूत तत्त्वांवर आधारित असलेल्या या अभियानामध्ये मंचर नगरपंचायतीने शहरात विविध उपक्रम राबविले असतात. यामध्ये श्रमदान, घनकचरा व्यवस्थापन, एकल प्लॅस्टिक वापर बंदी, पर्यावरण पूरक गणेशोत्सव, पर्यावरण सेवा योजना, वातावरणीय बदल परिणाम अंतर्गत कार्यशाळा, वृक्षगणना अहवाल, ध्वनी व वायू प्रदूषण आधारित जनजागृती उपक्रम, तसेच सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे मंचर नगरपंचायतीने पर्यावरण संवर्धनासाठी ६० हजारांपेक्षा अधिक वृक्ष लागवड केली आहे.

सर्व स्तरातून मुख्याधिकारी गोविंद जाधव व अन्य अधिकारी वर्गावर अभिनंदनचा वर्षाव सुरू असून मुख्याधिकारी गोविंद जाधव यांनी सर्व मंचर शहरवासीयांचे देखील अभिनंदन केले आहे.




### प्रथम क्रमांक मिळवण्यासाठी गतिमान पद्धतीने काम

» ११ हरित क्षेत्रांची निर्मिती करून मियावाकी उद्यानासारखा कौतुकास्पद प्रकल्प पूर्णत्वास नेला. पर्यावरण जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात आल्याने हा सन्मान मिळालेला आहे. यावर्षी द्वितीय क्रमांक मिळाला असून पुढच्या वर्षी प्रथम क्रमांक मिळवण्यासाठी मंचर नगरपंचायत व नागरिक अजून गतिमान पद्धतीने काम करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.